# गृहव्यवस्थापन प्रक्रिया
# (Process of Home Management)

**Dr.Ayodhya Pawal**

**Associate Professor**

**Department of Home Science**

**Arts & Science College, Shivajinagar Gadhi.**

# गृहव्यवस्थापन प्रक्रिया
# (Process of Home Management)

- गृहव्यवस्थापन प्रक्रिया म्हणजे केवळ कामासाठी केलेला आराखडा नसून काम व्यवस्थितपणे पार पाडणे हा उद्देश होय.

गृहव्यवस्थापनाच्या प्रक्रियेतील पायऱ्या :

- नियोजन
- नियंत्रण
- मूल्यांकन

# 1.नियोजन

व्याख्या :

**निकेल व डॉसी**

- नियोजन व्यवस्थापन प्रक्रियेची पहिली पायरी आहे. तिच्या अंतर्गत विस्तृत रूपाने निर्णय घेतले जातात. जे कौटुंबिक क्रिया साधने आणि कुटुंबाच्या बदलत्या गरजांच्या संदर्भात घेतले जातात.

**स्टार्च**

- कुठल्याही प्रकारच्या नियोजनात रोजच्या जीवनात येणारे अनुभव व विचार करणे यांचा समावेश होतो.

**रुथ डेकॉन,फायर बो**

- विशिष्ट परिणामांसाठी ज्या क्रियेचा अनुक्रम स्वीकृत केला जातो त्याला नियोजन असे म्हणतात.

# नियोजन करताना खालील घटक लक्षात घ्यावेत

- नियोजनात लवचिकता हवी.
- नियोजन करताना व्यक्तीच्या आवडीनुसार काम द्यावे.
- प्रत्यक्षात उपयोग करता येईल असे नियोजन असावे.
- आपल्यासमोर कोणती समस्या आहे याचा विचार करणे
- कल्पनेने पर्याय आजमावून बघणे
- यशस्वी होणाऱ्या पर्यायाची निवड करणे
- परिणामांची स्वीकृती करणे

# नियोजनाचे फायदे :

- प्रत्यक्ष काम कसे करायचे आहे हे नियोजनामुळे ठरते.
- नियोजनामुळे कामाचे योग्य दिशा ठरते.
- नियोजनामुळे आपल्याजवळ असलेल्या साधन संपत्तीचा योग्य उपयोग होतो.उदाहरणार्थ वेळ, पैसा, श्रम इत्यादी.
- नियोजनामुळे कामात अडचणी निर्माण होत नाहीत.
- नियोजन केल्यामुळे अवघड काम सोप्या पद्धतीने केले जाते.
- नियोजन केल्यामुळे आधीच्या कामातील चुका अनुभव असल्याने सुधारू शकतो.
- नियोजन केल्यामुळे व्यक्तीची कार्यक्षमता वाढते.
- नियोजन केल्याने निराशा टाळता येते.
- नियोजन केल्याने यशस्वीपणे ध्येय गाठता येते.
- नियोजनात कामाचे विभागणी केली असल्यामुळे योग्य व्यक्तीकडे योग्य काम जाते.

# 2) नियंत्रण

व्याख्या:

**निकेल व डॉर्सी :**

- नियंत्रण यंत्रासारखे असते की ज्यातून योजनांचा इच्छित परिणाम प्राप्त करण्यासाठी विशिष्ट दिशा प्रदान केली जाते

**रुथ डेकॉन आणि फायर बो :**

- नियोजन आराखड्यानुसार क्रियांच्या तपासणीला नियंत्रण असे म्हणतात

**डब्ल्यू एम. फॉक्सः**

- नियंत्रण हे कार्याच्या योजनेनुसार कार्य करण्याची संबंधित आहे.

# नियंत्रणाच्या पायऱ्या

- प्रेरणा देणे
- तपासणी करणे
- समायोजन करणे

# नियंत्रण यशस्वी होण्याकरिता खालील महत्त्वाच्या बाबी आवश्यक आहेत

- नियंत्रणाची वेळ योग्य असावी
- नियंत्रणाची पद्धत
- योग्य निर्णय घेणे
- नियोजनात लवचिकता असावी
- योजना कार्यान्वित होत असताना देखरेख करावे
- कुटुंबातील व्यक्तीचा सहभाग आवश्यक आहे.

# 3. मूल्यांकन

- गृहव्यवस्थापनाची मूल्यांकन ही तिसरी पायरी आहे. यामध्ये केलेल्या कामाचा आढावा घेता येतो यश व अपयश याचा अभ्यास करणे म्हणजे मूल्यांकन होय.
- **ग्रास अँड कॅण्डॉल:**
- **मूल्यांकन अशी पद्धती आहे की एखाद्या व्यक्तीला आपल्या जवळील उपलब्ध साधनापेक्षा जास्तीत जास्त समाधान मिळवून देण्यास मदत करते.**
- **ओपन हीम :**
- **पूर्वी केलेल्या क्रियेच्या परिणामाचे परीक्षण केल्याने एखाद्या व्यक्तीला आपल्या भविष्यातील कार्यात अधिक प्रभावशाली निर्णय घेण्यास मूल्यांकन सहाय्यक ठरते.**

# मूल्यांकनाचे महत्त्व :

- अपेक्षेप्रमाणे ध्येय साध्य झाले का?
- भावी योजना आखण्यासाठी
- स्वयं मूल्यांकन करता येते
- कामाचा दर्जा सुधारण्यासाठी

# मूल्यांकनाचे प्रकार:

- औपचारिक मूल्यांकन (Formal Evaluation )
- अनौपचारिक मूल्यांकन ( Informal Evaluation)
- स्वमूल्यांकन ( Self Evaluation)

# मूल्यांकन करण्याची पद्धत

- अपेक्षेप्रमाणे काम झाले का हे बघणे.
- कामाचा एक विशिष्ट दर्जा असतो त्याप्रमाणे काम झाले का त्याच्याशी तुलना करून कामाचा दर्जा ठरवणे.
- कामाबद्दल गृहिणीने स्वतःलाच प्रश्न विचारावे म्हणजे झालेल्या कामाच्या यशस्वीतेची कल्पना येते.
- कामात राहिलेल्या त्रुटीची नोंद ठेवल्यास पुढील योजनेकरता त्याचा उपयोग होतो.
- आपल्या कामाची कुटुंबातील इतरांशी चर्चा करावी म्हणजे दुसऱ्यांना कामातील चुका लवकर दिसतात व आपल्याला सुधारणा करण्यास मदत होते.

The image cannot be displayed. Your computer may not have enough memory to open the image, or the image may have been corrupted. Restart your computer, and then open the file again. If the red x still appears, you may have to delete the image and then insert it again.

# *THANK YOU*